# प्रकरण तिसरे

## युगप्रवर्तक आणि रमाई या कादंब-यांतून घडलेले

## रमाईच्या भावजीवनाचे दर्शन

रमाई ही एका गरिब कुटुंबात जन्माला आलेली मुलगी. लहानपणीच तिचे आईवडिल वारतात आणि ह्या आइबापाविना पोरक्या झालेल्या मुलीचे पालनपोषण कसे झाले आणि तिचे वयात आल्यानंतर त्या काळच्या रूढीप्रमाणे झालेले लग्न व लग्नानंतर तिने सुखदु:खे भोगत एका वादळाला दिलेली साथ म्हणजेच तिच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंतच्या आयुष्यात जे घडले ते यशवंत मनोहर यांनी " रमाई " मधून व हरिभाऊ पगारे यांनी " युगप्रवर्तक " या कादंब-यातून दाखवून दिले आहे.

" रमाई " या कादंबरीत सुरुवातीसच वर्णन करताना यशवंत मनोहर म्हणतात.

" रमाईचा जन्म एका गरिब कुटुंबात झाला होता. दाभोळजवळ एक छोटसं गांव आहे वणंदगाव हे या गावाचं नाव, नदीकडल्या अंगान पण गावाला लागूनच महारपुरा होता. या मोहल्ल्यात अस्पृश्यांची पाचपन्नास घरं होती. कोणी कांबळे होते. एक दोन घरे ढेंगळयांची होती तर काही वानखडयांची तर काही सोनुल्यांची काही घर ढाल्यांची होती तर काही घर रामटेक्यांची होती काही मंडळी ओव्हाळ होती तर काही घरं निकम वगैरेंची होती. इथे एक घर धूत्रे नावाच्या माणसांचेही होत.

माणसं कष्ट करीत पोट भरीत मिळेल ती मजूरी करीत प्रपंच चालवीत आणि वावरा शेतात काम करीत. कोणी माती गोठयाचं काम करीत या अस्पृश्य मोहल्ल्यात एक जरा टापटिपीचं घर होतं. या घराच्या अंगणात गर्द हिरव्या काळ्या रंगाच कडूनिंबाच झाड होतं. दुस-या बाजूला गुलमोहर होता. या घराचा मालक होता भिकू धूत्रे. भिकू धूत्रे होता गरिबच पण तो पलटणीत होता. त्यामुळे इतर गरिबाच्या तुलनेत हा गरिब जरा व्यवस्थित होता, इतकच, शिवाय भिकूचा भाऊ आणि मेहूणा मुंबईत रहात होता. त्यामुळे त्यानं मुंबईसुध्दा एकदोनदा बघितली होती.

तेव्हा तो काही एकदम खेडवळ नव्हता. त्यामुळे धुत्रे हे नांव त्यानं सोडले होते आणि वलंगकर हे नांव घेतलं होतं.

भिकूची बायको रुक्मिणी घरची सर्व कामं करी. गोव-या वेचून आणणं, स्वयंपाकासाठी इंधन आणणं, शेणाच्या गोव-या वेचून आणणं आणि थांपणं आणि मोलमजूरीची छोटी मोठी कामं करणं अशी रुक्मिणीची कामं होती.

भिकू मात्र दाभोळ बंदरात कामाला जात असे. समुद्रापासून बाजारापर्यंत माशानी भरलेल्या टोपल्या नेण्याचं काम तो करीत असे. छाती फोड काम करुन भिकू आपला प्रपंच चालवीत असे. भिकू रुक्मिणीला चार मुले झाली. त्यात तीन मुली होत्या आणि एक मुलगा होता. सर्वात मोठी मुलगी दापोलीला दिली होती. तिचे नीट चाललं होतं. भिकू रुक्मिणीच्या डोक्यावरुन एक ओझं उतरलं होतं. भिकूला आता उरली होती तीन मुलं रमा मोठी होती. गौरा तिच्याहून लहान होती आणि सर्वात लहान होता शंकर.

रुक्मिणीचा रमावर फार जीव होता. सारखी ती रामी रामी करत राही. घरात रमाची तिला खूप मदत होई. झाडझूडीपासून पाणी भरण्यापासून ते अंगण सारवण्यापर्यंत तिला रामीची मदत मिळे. रामी खूप कष्टाळू होती सारं घर ती आवरत असे शिवाय शेण आणणं त्याच्या गोव-या थापणं आणि त्या विकणं या सर्व कामातही रामी आईला मदत करी. मुलं झोपली की भिकू आणि रुक्मिणी आपल्या संसारासंबंधी आपल्या मुलासबंधी बोलत असत. झोपलेल्या रामीच्या निरागस चेह-याकडे पाहून रुक्मिणी म्हणे.

" थकून भागून झोपली माझी रामी ! दिवसभर कामचं करत राहते विसावा म्हणून नाही. "

रामीच्या तोंडावरुन मायेचा हात फिरे गळागदगदून येई. तिचा भिकू म्हणे तिला एवढी कामं नको करु देऊ "

" ती ऐकेल तेव्हा ना ?
पोरगी बघा कशी वाढून गेली
नको म्हटलं की जीव दुःखतो तीचा

रुक्मिणी आणि भिकू यांच्यामध्ये खूप वेळपर्यंत असं बोलणं सुरु राही. दोघही भरल्या डोळ्यानी रामीकडं पहात रहात. रुक्मिणीचा मायेने पिकलेले हात रामाच्या तोंडावरुन फिरत राही ".[१]

या पार्श्वभूमीवर रमाचे बालपण घडत असताना पहावयास मिळते. संसार करत असताना आई वडिलानी मुलाना कसे संस्कार दिले पाहिजेत. याचे दर्शन आपल्याला खालील प्रसंगातून जाणवते. ज्यामुळे रमाईचे जीवन संस्कार संपन्न बनत होते.

" रुक्मिणी ही अत्यंत समजूतदार बाई होती. तीही कष्टात जन्माला आली होती. दारिद्र्यासोबत वाढली होती. अब्रून रहांव आई-बापाच्या नावाला बट्टा लावू नये कष्ट करावे. मन लावून नव-याचा संसार करावा स्वच्छ रहावं स्वच्छ मनानं जगावे पोराबाळानाही हिच इज्जत अब्रूच वळण लावावं कोणाच्या अध्यात पडू नये. मध्यात पडू नये . अशा संस्कारात ती वाढली होती. ती नेकीन जगली होती. रुबाबाबत वागली होती. रुक्मिणी रामीला सांगत होती.

" रामी बेटा तू आता मोठी होत आहेस तू तुझ्या वयाच्या मानानं खूप समजूतदार आहेस."

" बेटा कष्टाशिवाय मनुष्य मरतो कष्टानं मरत नाही. बेटा आयुष्यात कोणाच उणं चिंतू नये कोणाचं वाईट चिंतू नको. रामी कोणाची निंदा करु नये आपलं काम नेटान करत रहावं ".[२]

या आदर्श वातावरणात रमाचे बालपण गेले होते. खेडेगावामध्ये एकादा सण साजरा होत असताना काही बायका एकत्र येतात. आणि रमाबाईच्या लग्नाची चर्चा कशी करतात हे रमाबाईनी सांगीतलेल्या आठवणीतून जाणवते.

" मी ओटीवर एकटीच होते. घरात खूप बायका जमल्या होत्या. त्या सर्व बायका नुकत्याच वटसावित्रीला माझ्या आईबरोबर गेल्या होत्या. का कुणास ठाऊक, पण मी मात्र आईबरोबर गेले नव्हते. ओटीवर उभी राहून मी आत चाललेले माझ्या संबंधीचे बोलणे ऐकत होते. बहुधा आत माझ्या लग्नासंबंधी चर्चा चालू असावी. म्हणूनतर मी बाहेर उभी होते. एरव्ही मी पण त्यांच्यात बसून गप्पा नसत्या का मारल्या ?

घरात जमलेल्या बायका निघून गेल्या पण जाताना त्या माझ्याकडे पाहून गालातल्या गालात हसल्या होत्या मला मोठं नवल वाटलं होतं कां बर या बायका हासल्या ? मला कोडचं पडलं इतक्यात माझी आई बाहेर आली.

" रमा, तू पायगुणाची आहेस हं ! तुला असा नवरा मिळणार आहे की "

बोलता बोलता आई मध्येच थांबली माझ्याकडून बघून बायका का हसल्या ते मला चटकन कळले, मी आईकडे पहात बसून विचारलें.

कसा नवरा मिळणार आहे ग मला ?

गणपती सारखा ! ज्यांचे कान हत्तीच्या कानासारखे लांब असतात. आणि पोट गणपतीसारखं !

असा नको ग बघ मला नवरा ! मी थोडीशी निराश झाले. आणि म्हणाले त्या दिवसापासून गणपतींच पोट आणि कान हे दोन शब्द माझ्या मनात रुतून राहिले मी मनातल्या मनात निर्णय घेतला की अशा माणसाबरोबर आपण मुळीच लग्न करायचं नाही. आपल्याला नवरा अगदी कसा गोरागोरा पान पाहिजे !"[3]

असे रमाचे भावविश्व फुलत असताना रमावर आघात झाला. घरामध्ये एकमेकावर प्रेम करीत रहात असताना अचानक झालेला आईवडिलांचा मृत्यू आणि आईविना होणारी मुलांची कुचंबणा आणि त्यातून पडलेली रमाई रमाईवर जबाबदारी दिसते.

५

" रमाचं बालपण असं सुखात चाललं होतं कष्ट होते गरिबीही होतीच. तरी भिकू वलंगकराच्या घरी या गरिबीतही सुखे फुलत होती. नवरा बायको आणि त्यांची तीन मुलं असा तो आटोपशीर संसार होता. मुलं चांगली होती. आज्ञेत होती घ रात कुरबूर नव्हती. भिकूलाही कोणाते व्यसन नव्हते. त्यामुळे छान चालले होते. घरातील सर्वांचाच एकमेकावर लोभ होता. पती पत्नी एकमेकांच्या सुखासाठी झटत होते. छान चाललं होत पण एक अशुभ दिवस उगवला. वलंगराचं घर तडकून गेलं.

रखमानं कष्ट खुप उपसले जीवाची पर्वा केली नाही । देहाची पर्वा केली नाही. रखमा त्यामुळे खंगत चालली होती. शिवाय नव-याची चिंता. भिकूची प्रकृती तशी चांगली रहात नसे. दाभोळ बंदरात भिकू कष्टाचे काम करीत असे माशांच्या टोपल्या वाहून त्याला छातीच दु:खण जडलं होत. एके दिवशी त्याला रक्ताच्या उलटया झाल्या होत्या. भिकू आपल्या आजाराबद्दल रुक्मिणीला सांगत नसे दु:खणं अंगावर काढत असे त्यामुळे नव-यांची चिंता खूप वाटे या चिंतेनेही ती आतून पोखरली गेली होती.

एखादी वेल करपावी तशी रुक्मिणी करपून जायला लागली. तिनं जणू हाय खाल्ली होती. तिनं अंथरुण धरलं. रुक्मिणी आजारी असल्याची वार्ता मोहल्यात पसरली बायाबापडया आल्या. चौकशी करु लागल्या रुक्मिणी तू उगीच जीवाला लावून घेत आहेस. मैनाबाई म्हणाली एवढी हिमतीची बाई तू अशी कशी आजारी पडलीस रुक्मि तू ? शेजारच्या विठाबाई म्हणाल्या, " खावं प्यावं " औषध पाणी करावं बरं सांगू रुक्मिणी तुला काहीही झालं नाही तू फुकटचा घोर जीवाला लावून घेतलास । यशोदाबाईन धिर दिला.

असे दररोज कोणी येत रुक्मिणीशी बोलत. तिला धीर देत. तिला औषधपाणी सुरु होतं. या गावठी औषध पाण्यानं काही तिला आराम पडला नाही. मुंबईच्या तिच्या भावाला निरोप गेला. तोही लगोलग आला. रुक्मिणीचा आजार बळावतच गेला ती वाळून कोळ

झाली होती. शेवटी एके दिवशी रुक्मिणीनं घरची सर्व मंडळी हजर असताना शेवटचा श्वास घेतला.

भिकूच अर्ध अंगच या घटनेनं लुळ पडलं संसाराचा अर्धा गाडा रुक्मिणीच ओढत होती. भिकूवर पहाड कोसळला होता. रुक्मिणीचा भाऊ गोविंद पुरकरही धाय मोकलून रडला. रुक्मिणीन पोरांची काळजी घे म्हणून त्याच्यावर शिणभार टाकला होता. गौरा शंकर आणि रमा ही मुलं आईविना पोरकी झाली होती.

आजूबाजूचे नातेवाइक जमले सगळे हळहळले शेजारी पाजारी आले सर्वांनी डोळयाना पदर लावले. सर्व हळहळले आईच्या मृत्यूचे गौराला व शंकरला काही विशेष वाटावं असं त्यांच वय नव्हतं पण रमाला या दुःखाचा अर्थ कळत होता. आईची उणिव तिला आता जास्त जाणवणारं होती. कारण तीला ती भरून काढायची होती.

रमाला आता आपल्या बापाचीही आई व्हायचं होतं. सगळा भार आता रमावर पडणार होता. रमा आई आई करीत होती. रडत होती पण रमानच स्वतःची आसव पुसली. तिला पोरकं करणा-या या मरणाचा परिचय करून घेऊन रमा पुढची वाट चालू लागली." [४]

असाच आणखी एक प्रसंग आई वारल्या नंतर रमाच्या जीवनात येतो. " रमानं भिकूला हिम्मत दिली. पण भिकू आतूनच खचला होता. तो आजार त्यांच्या अंगात चांगलाच मुरला होता. आता बायकोच्या मृत्यून तो आतून फाटून गेला त्याच्यावर कोसळलेले दुःख तो आपल्या दुबळया हृदयान पेलूच शकला नाही. त्याचं आयुष्य खरं तर निमित्तालाच टेकल होतं भिकूनही खाटल धरलं. त्याच्या पायातलं बळच गेल होतं. बायकोच्या मृत्यूनंतर खिळी बसलेल्या चाकासारखी त्याची गत झाली होती. एक दिवस त्याची प्रकृती हाताबाहेर गेली. छातीत कळा येऊ लागल्या त्यानं मुलाना जवळ बोलावलं रामी मोठी होती. तिला येऊ घातलेल्या प्रसंगाची चाहूल लागली होती त्या प्रसंगाचा अर्थ ही तिला कळत होता. आईच्या मृत्यून तिच्या काळजाचा एक लचका तोडला होता आता दुसरा लचका तोडायला

बापाचा मृत्यू पुढं येऊन उभा राहिला होता. छातीत येणा-या कळांना चुकवून भिकू बोलत होता. रामीला शेवटच काही सांगू पहात होता. वाचा अडखळत होती. श्वासांचा तोल जात होता. भिकू रामीला सांगू पहात होता.

रामी ! रामी बेटा ! तुझ्या आईनं आम्हाला तुझ्यावर सोपवलं होतं आता या दोन लहान जीवाना मी तुझ्यावर सोपवून जातो. या पिलाना अजून पंखही फुटले नाहीत बेटा ! त्याना सांभाळ, त्याना आईबाप आठवू देवू नको. रामी ! कालवर तू त्यांची केवळ आई होतीस आता तू त्यांचा बापही व्हायचं रमा ! तुझ्या या लहान लहान पंखावर मी या अजाण आयुष्याची ओझी ठेऊन जातो आहे. वाईट वाटतं रामी पण इलाज नाही आता इलाज नाही. सांभाळ रामी बेटा सांभाळ.

भिकून पोरीच हात हातात घेतले, गौरा आणि शंकर व्याकूळ हंबरडा फोडत होते. भिकून त्या आपल्या कच्च्याकडे पाहिलं आणि डोळे मिटले.

यावेळी रमाला रडू आलेच नाही सगळे हळहळत होते. रामीच रडणं मात्र हरपलं होतं. तिच्या डोळयाना आसवांचे झरे लागत नव्हते. तिच्या कंठात शब्द जन्मत नव्हता. रामी सुन्न झाली होती. दोन मरणानी तिच्या खेळण्याच्या वयात तिला पोरकं केलं या मरणांनी तिला अंतर्मुख केलं. रामी आता प्रौढच झाली. आई बापाविना पोरकी रामु एवढचं म्हणाली लहानपणी कोणाचेही आईबाप मरु नयेत. आणि तिनं आपलं तोंड तळव्यानी झाकून घेतले -[५]

रमा आणि तिची लहान दोन भांवडे आईबापाविना पोरकी होतात आणि त्यांचे पालनपोषन चुलत्यान आपल्या घरी नेऊन कसे केले व तिथेच रमाच वयात येणं आणि तिच्या लग्नासाठी करावी लागणारी धडपड अतिशय समर्थपणे युगप्रवर्तक मध्ये दिसते.

" दापोलीला माझे वडिल वारले, माझे चुलते, मला, माझी बहीण गौरा आणि भाऊ शंकर आम्हाला बरोबर घेऊन मुंबईला आले. ~~तरीही~~ आम्ही भायखळा मार्केट जवळच्या एका चाळीत रहात होतो. माझे काका लाकडाच्या वखारीत कामाला होते माझे मामा गोविंदपूरकर हे अधूनमधून आमच्या घरी येत होते. एकदा ते असेच अचानक घरी आले आणि काकाना काहीतरी सांगून गेले.

दुस-या दिवशी काकानी मला नवं लुगड नेसायला लावले आणि काही सूचना केल्या मला समजत नव्हत की हे काय चाललंय ? पण मला फार वेळ अंधरात रहावं लागलच नाही थोडयाच वेळात मामा काही मंडळीना बरोबर घेऊन आमच्या घरी आले. चहापाणी झाल्यावर काकानी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी वागले मामांबरोबर आलेले पाहून एकगृहस्थ माझ्याकडे पहात काकाना म्हणाले ठिक आहे. आम्हाला मुलगीपसंत आहे पंचना बोलावून पुढचा कार्यभाग उरकून घेऊ ".[६]

रमा आईबापाविना पोरकी झालेली मुलगी अनाथानं गांजली होती. आणि त्यात ती काहीही शाळा शिकलेली नव्हती. तरीही तीला नववी शाळा शिकलेला मुलगा मिळणे हा केवळ तिच्या नशिबाचाच भाग आणि त्यामुळे तिला येणारी आईबापाची आठवण किती दाहक आहे याचे वर्णन यशवंत मनोहर यांनी घडविले आहे.

" रमाचं लग्न भीमा नावाच्या मुलाशी ठरलं भीमा रमाच्या लग्नाची तारीख जाहीर झाली. भायखळ्याच्या इम्प्रूव्हमेंट चाळीत आणि परळच्या डबक चाळीत चर्चा धावू लागली.

रमाचं लग्न ठरलं

कोणाशी ?

रामजी सुभेदारांच्या मुलगा खुप शिकला आहे

किती ?

यावर्षी नवव्या वर्गात आहे पुढल्या वर्षी मॅट्रीक होणार

बाप रे !

आपल्या समाजात इतक शिकलेला मुलगा नाही भिकू वलंगकराच्या रमाचं आयुष्य उजळून निघेल. पोर अनाथपणात गांजली आहे. छान झाल बिचारीचं ।

इकडे डबक चाळीत चर्चाची कारंजी सुरु झाली होती. भीमाचं कौतूक करता करता काही लोक रमा शिकली नाही याचा उच्चारही करुन जात होते.

रमाच्या लग्नाचा दिवस येऊन ठेपला. लग्नाचं स्थळ होतं भायखळयाची बाजारओळ रमा नवरी झाली होती भीमराव वर झाला होता. नवरी नऊ वर्षाची होती. नवरा मुलगा सतरा वर्षाचा होता. दोन्हीकडील व-हाड मंडळी बाजारात आली उपराच्या दुस-या बाजूला वधुकडील मंडळी जमली होती. बाजारातल्या विक्रीसाठी माल ठेवायच्या चबुत-यावर वर वधू बसले होते. चबुत-याखालून वाहणा-या गटारातून घाणपाणी वहात होते. दुर्गंधी सुटली होती. रमा भीमरावच लग्न होत होतं. घाई करायची होती बाजारभरण्यापूर्वी सर्व उरकायचे होते. सर्वजण नव-या मुलाकडे मोठया कौतुकाने पहात होते. असा सुशिक्षीत वर पहाण्याची ही त्यांची पहिली वेळ होती. रमाच्या मैत्रिणीमध्ये हसणे खिदळणे सुरु होते. वराकडील तरुण पोरांचे हसणे खिदळणे सुरु होते.

भीमा रमाचे लग्न लागले वडिल मंडळींनी वधूवराना आशीर्वाद दिला, भीमा रमा चबुत-यावर बसून होते. भोवती आनंदाला उधान आले होते. अनोखा उत्सव भायखळयाच्या बाजारात मांडला गेला होता. बाजारातील चबुत-याच्या बोहल्यावर भीमासोबत बसलेल्या रमाच्या मनातही दु:खाचे अनेच कढ दाटून येत होते. तिच्या अनपेक्षित अवती-भवतीच्या कोणाही मुलीच्या वाटयाला आला नाही असा नवरा तिच्या वाटयाला आला होता हे सवंच तिला अनपेक्षित होते. जखमी मोरानं फुलवलेला पिसारा असावा तसं हे तिच नवरीच सजवलेलं रुप होते. आठवणीच्या लाटा तीला काठावर नेत होत्या.

आज माझी आई असायला हवी होती.

आज माझे बाबा असायला हवे होते

माझ्या आईबाबाना केवढा आनंद वाटला असता. आपल्या पोरीच्या वाटयाला आलेल्या या सुखानं त्याना गगन ठेंगणं झालं असतं. सर्वात जास्त शिकलेला जावई आपल्याला मिळाला याची त्याना केवढी खुशी झाली असती हे सुख भोगायला माझे आईबाबा आज हवे होते. तिच्या मनात भावनाणी असा कल्लोळ मांडला होता. आठवणींनी असा खेळ मांडला होता. तिचं पोरकं मन लग्नाच्या चबुत-यावर बसून आईबापासाठी असं व्याकूळ हंबरत होते. ती क्षणात वर्तमानात फेकली जात होती. या एका नव्या वळणावर ती उभी होती. आईबापाच्या मृत्यूनं तीला पोरकपण आलं होतं आणि आनंदाच्या क्षणी ते पोरकेपणं अधिकच उत्कट होत होतं.

एक झोका तिला अंधरात नेत होता. दुसरा प्रकाशात आणत होता. अशाच मनस्थितीत तिनं भिमाच्या गळयात हार घातला होता ती भीमाची पत्नी झाली होती.

भीमाच्या नावाचं कुंकू रमानं लावीलं. रमा विवाहीत झाली होती. पण या घटनेवर संपूर्ण अर्थ त्यावेळी तिलाही सांगता आला नसता. कोणालाही तो अर्थ सांगता आला नसता. तिच्या आयुष्यात पुढं जे घडलं त्याचं भविष्य त्यावेळी कोणालाच सांगता आल नसतं तिचं लग्न झाल होतं पण या घटनेचा फार मोठा भाग तर भविष्याच्या अंधरात दडलेला होता. तिच्या एका प्रश्नाचं उत्तर मिळालं होतं. भवितव्यान तेवढयापुरती आपली मुठ सैल केली होती पण या घटनेपोटी जन्माला आलेले अनेक प्रश्न परत त्याच काळोख्या मुठीत बंद झाले होते..

काय घडणार आहे हे कोणालाच माहित नव्हतं. एवढ खरं की रमा एका वादळात सापडली होती. तिच्या पदराची गाठ एका तुफानाशी बांधली गेली होती. वादळ नेईल तिकडे जावं लागणार होतं रमा आता वादळाची सावली झाली होती. सुर्यासाठी सावली झाली होती. पण योग असा होता की हे वादळालाही माहित नव्हतं सावलीलाही माहित नव्हतं सुर्यालाही ते अज्ञात होतं सगळेच निर्णय भविष्याच्या

काळोखाने दडवून ठेवले होते." [७]

या प्रसंगानंतर रमाचे संपूर्ण भावजीवनच बदलून गेले.

रमा एक अनाथ मुलगी होती. तिच्या लग्नानंतर ती भीमराव आंबेडकरसारख्या वादळाची सावली बनली आणि त्या वादळाच्या पाठीशी रमा कशी उभी रहाते हा प्रश्न सर्वांनाच पडतो. पण रमाने सर्व दुःखाना पचवून आपली वाटचाल चालूच ठेवली. रमाचा नवरा मॅट्रीक पास झाल्यानंतर तीने आनंदाच्या भरात नव-याचे केलेले स्वागत आणि नव-याला पुढील शिक्षणासाठी दिलेले उत्तेजन रमाईमधून प्रकट होताना दिसते.

रमा सुभेदाराची सून झाली आणि वलंगकर हे नाव बदलून ती आता आंबेडकर झाली रमाचा संसार सुरु झाला घरात सुभेदार होते. आनंदराव होते त्यांची पत्नी लक्ष्मी होती आणि सुभेदारांची बहिण मिराबाई होती मीराबाई पांगळी होती सावत्र आई जिजाबाई होती कुटुंब मोठ होतं. आंबेडकर कुटूंब असं नांदत होतं भायखळा इंम्प्रूव्हमेंट चाळीतून रमा आणि डबक चाळीत आली. वरळच्या चाळीत आली एक चाळ सोडून दुस-या चाळीत आली काका आणि मामा यांच्या घरापेक्षा आंबेडकरांच्या घराचं वातावरण वेगळच होतं या घरात शिक्षण हेच सर्वस्व होतं. भीमरावाच्या शिक्षणाभोवती सर्व घर फिरत होतं. मीराबाईही तिला व्यवहार सांगत असत. रमा वृत्तीन सात्विक होती पण आता तिच्यावर एका मोठ्या संसाराची जबाबदारी आली होती.

रमा धीरान सगळया गोष्टी समजावून घे. भांबाहून जाऊ नको. लक्ष्मी तुझ्या मदतीला आहेच.

रमाला आनंद वाटे धीर येई. मीरा आत्या तिला आई सारखी वाटे. मीरा आत्या भीमरावांच्या अभ्यासाबद्दल तिला खूप सांगे तिलाही या अभ्यास वेडाचे नवल वाटे. नव-याचा अभिमान वाटे.

मॅट्रीकचा निकाल लागला. सर्वांनाच भीमरावाचा गर्व वाटला पण रमाच तर काळीजच सुपा एवढं झाल. या सुपा एवढया काळजानं तिन भीमरावाला ओवाळलं नव-याच कौतुक कोणात्या शाब्दात करावं हे तिला सुचेना पण ती शाब्दाने बोललीच नाही. तिचे डोळेच काय ते बोलले रमाला खूप धन्यता वाटली.

भीमरावाचा सत्कार झाला. सी. के. बोले अध्यक्ष होते. केळूस्कर गुरुजी वक्ते होते भीमराव उत्सव मुर्ती होते. खूप हार घातले लोकानी कौतुक केलं नव-याच कौतुक ऐकताना नव-याचं भाव विश्व फुलत होतं. आनंदाच चांदण तिच्या वृत्तीच्या ताटव्यात फुलत होतं. भिमरावानं तिला एकान्तात विचारलं.

'तुला काय वाटलं रमा माझ्याबद्दल ?

पुरानं नदी फुगावी तशी ती आनंदान फुलली होती, म्हणाली

तुम्ही खूप मोठे आहात ।

केवढा ।

मला सांगता येत नाही एवढे ।

खूप शिकीन मी

खूप शिका मोठे व्हा खूप ।

केवढा

कोणाला सांगता येणार नाही तेवढे

13171
A

गदगदल्या मनानं रमा बोलत होती आपल्या मॅट्रीक पास झालेल्या नव-याचा पराक्रम पहात होती इतर या पराक्रमाला आशीर्वाद देत होते. त्याचं अभिनंदन करीत होते. रमा या पराक्रमाची सावली झाली होती. या झेपावत निघालेल्या प्रवासाची साथ देण्याचं वचन तिन दिलं होतं .[८]

दोघांचे समृध्द होत चालले भावजीवन अतिशय काव्यात्मकतेने मनोहरांनी आपल्यासमोर उभे केले आहे. पती आणि पत्नी यांची एकरूपता उत्कट प्रेम यांचे भावस्पर्शी चित्र यातून साकार होते.

रमा आईवडिल वारल्यानंतर चुलत्याच्या आशीर्वादानं लहानाची मोठी झाली आणि रामजी सुभेदारांची सून झाली आणि तिने स्वबळावर नव-याच्या घरातील लोकांची मनं जिकून आंबेडकरांचे संपूर्ण घरचं रममय करुन सोडले याचे वर्णन यात येते.

" रमाचं लग्न होऊन आता दोन वर्ष झाली होती तिला इथं परकं अस वाटतच नव्हतं. मोठया बहिणीसारखी लक्ष्मी होती. मिराबाई तर तिच्यावर पोटच्या गोळयाप्रमाणे प्रेम करीत असत. आणि रामजी सुभेदार तर तिला लेकीसारखे मानीत. सर्वांचा तिच्यावर जीव होता तिनही सर्वांचा लोभ संपादन केला होता. आंबेडकरांच घर आता रमाचं घर होऊ लागल होतं. आंबेडकर या झाडाची ती एकजीव फांदी झाली होती. इथे आपण बाहेरुन आलो आहोत हा विसर तिला पडला. परकेपणाचं धुकं वितळल रमाभोवती आंबेडकरांच्या घराच मन डोलत असे. रमा साधी होती. पण सात्विक होती. रमा अडाणी होती पण सुसंस्कृत होती. रमाला स्वत:च अस निराळं सुख नव्हतं. घरातल्या माणसांच्या सुखानाच तिनं आपल सुख मानलं होतं. स्वत:च्या सुखाची तिची व्याख्याच निराळी होती त्यामुळे ती या घरातील उत्सव झाली होती. तिच्या प्रेमान या घरावर ताबा मिळवला होता. आंबेडकरांचं घर अस रममय झाल होतं.

या सुमारासच भीमरावला कधी तरी वाटलं की रमाला शिकवावं, घरची गरिबी आणि खेडयात बालपण यामुळे ती शिकली नाही पण आता तर ती शहरात आली. शिकायला इथं तर काही अडचणी नाही. एके दिवशी निवांत वेळी भीमरावानी विषय काढलाच रमाला फार नाही तरी थोडसं अनपेक्षित होतंच भीमराव म्हणाला.

रमा तु आता शिकायला पाहिजे. रमा भारावून गेली होती. भीमराव खरच निराळा होता. तो काही तरी वाकवू पहात होता. नवं जन्माला घालू पहात होता. हे वादळ आपल्या सावलीला मागे सोडायला तयार नव्हते.

रमानही साथ दिली सगळा प्रपंच ती सांभाळत होती. संसाराचा डोंगर वाहून नेत होती. खूप शिकणं रमाला जमलं नाही. पण ती शिकली. लिहायला शिकली वाचायला शिकली. भीमराव कॉलेजात जाई. तेव्हा त्याच्या खोलीत पसरलेल्या पुस्तकातील एखादे मराठी पुस्तक ती निवडी आणि दुपारच्या वेळी वाचत असे मनाला हळूहळू नवी पालवी फुटत असल्याचे सुख ती अनुभवतीत होती. पण मध्येच संसाराची हाक येई. ही हाक आली की रमाचे मन तिकडे धाऊन जात असे. पालवी तिथेच राहून जाई. कोमेजूनही ब-याचदा जाइ -.[१]

रमानं संपूर्ण घर आपलेसे केले होते. ती सर्वांशी एकरूप झाली होती. वादळाशीही तीन जमवून घेतल होतं. ती अडाणी होती. तरी सात्विक होती भावनाशिल होती. कुटूंबावर प्रेम करणारी होती. आणि विशेष म्हणजे बाबासाहेबांचे प्रत्येक वाक्य प्रमाण मानणारी होती. त्यांची प्रत्येक इच्छा अपेक्षा याना प्रामाणिक साथ देणारी यामुळेच तीन शिकावं अशी बाबासाहेबानी इच्छा व्यक्त करताच ती गलबलून गेली. गोंधळून गेली पण एका महान व्यक्तीमत्वाला अपेक्षित अशीच इच्छा असल्याने तिने ती स्विकारली आणि रमाचे पुढील आयुष्य बदलून गेले.

* रमा आपला संसार करत बाबासाहेबांना साथ देत असताना तीला झालेली आईपणाची जाणिव आणि आईपण मिळाल्यानंतर मुलाचे नाव ठेवण्यामागची भूमिका ही एकूण तिच्या व्यक्तिमत्वात झालेल्या बदलाची निदर्शके अशी होती.

* सुभेदारांच घर बदलत होतं वेगळा प्रकार या घरात सुरु झाला होता. एके दिवशी या घरात नवाजीव आला. १९१२ सालातला डिसेंबर महिना होता. रमा आई झाली होती. रमाईच मन कृतार्थतेने ओथंबल होतं. आपल्या दुःखावर तीन विजय मिळवला होता. भीमरावाच्या पोराचं सुभेदाराना केवढं कौतुक। नातू झाला होता. त्याना ते स्वतःच लहान मुलासारखे उत्साही झाले होते. चाळभर ही गोष्ट त्यानी सांगितली होती. मीराबाईला आपली ही भाचेसून लेकूरवाळी झाली. याची अपार खुशी झाली. हाताची बोट कानशिलावर धरुन तिनं मोडली. भीमराव तीचा खूप लाडका होता. असे पंधरा दिवस गेले महिना गेला. बाळाचं नाव ठेवायला दिवस ठरला कोणी गोविंदा नाव ठेवलं. कोणी वामन ठेवलं. कोणी अशोक ठेवलं कोणी काही. कोणी काही अशी खूप नांव ज्या त्या बायकानी ठेवली. पण भीमरावला त्यातल एकही नाव आवडल नाही.

एकदा निवांत वेळी बाळ पाळण्यात होतं. जागचं होत त्यचं हॅं हू चालल होत. भीमराव रमाला म्हणाले बायानी ठेवल्यापैकी तुला कोणतं नांव आवडल ?

मला नाही आवडलऋ एकही नांव ।

मी सांगतो एक सुंदर नाव तुला।

कोणतं ?

यशवंत ।

फारच छान रमा म्हणाली

फारच छान केवळ नाही, फार अर्थ आहे त्या नावात

कसा ?

अगं जोतिबा फुल्यानी आपल्या दत्तक मुलाच नाव यशावत ठेवलं होतं. मग यशवंता हेच नाव ठेवू. रमा जोतिबांचे आपण कोणीतरी लागतो. जोतिबा फुले हा आपला खरा कुलपुरुष आहे. रमा त्यांची आवड तीच आपली आवड.

छान नाव शोधलं तुम्ही मला खूप आवडलं आपलं बाळ आजपासून यशवंत झालं. त्यानं आपल्यालाही यशवंत करावं खूप यश तुम्हाला मिळावं. रमा तुला यशवंत हे नाव आवडलं मला खूप आनंद झाला. बाळ त्या दिवसापासून यशवंत झाला. रमाच्या या पोरानं घरात नवा सुगंध आणाला. घरात एक कौतुक रंगू लागलं या कौतुकाला सगळं घर यशवंत म्हणो' रमाचं मन आता पाखरानी भरलेल्या झाडासारखं झाल होतं. रमाला आता क्षणाची फुरसत नव्हती.

रमाला यशवंतान आईपण दिलं होतं. तिच्या स्त्रित्वाची परिपूर्ती झाली होती. रमा कृतार्थ झाली होती. रमा रमाई झाली होती. तिच्या मनाला आणखी नवी दिशा फुटली होती. वात्सल्याची दिशा दिवस कसे जात ते कळत नव्हते या एवढ्या सुखानंही रमा थकत नव्हती ती अधिकच उमलत होती अधिकच टवटवीत होत होती. जगण्यात अधिकच खोल जात होती .१०

यशवंत हे नाव दोघानाही आवडलं. बाबासाहेबांचे विचार एका अर्थाने रमाईच्या भावजीवनात संक्रमीत झाले. दोघोचेही भावजीवन वैचारिक दृष्टयाही कसे संपन्न होते ते यातून जाणवते. एवढेच नव्हे तर रमाईचे आकलनही संपन्न होते ते यातून जाणवते. एवढेच नव्हे तर रमाईचे आकलनही संपन्न बनवित होते. हे यातून दिसते. एखाद्या महापुरुषाला साथ देत असताना काल्पनिक आणि वैचारिक निष्ठा या कशा महत्वाच्या ठरतात आणि त्या दोन्ही कशा रमाईने संभाळल्या त्यातून ती कशी मोठी बनली त्याचबरोबर ती श्रेष्ठ पत्नी श्रेष्ठ माता झाली हेही यातून प्रकट होते.

सामाजिक समतेसाठी आयुष्यभर बाबासाहेबानी संघर्ष केला. यामध्ये बाबासाहेबांची प्रेरणा रमाई होती. ती मुक होती. अबोल होती. पण बाबासाहेबाना बळ देणारी होती. त्यांची सामाजिक निष्ठा तिच्या ठिकाणीही होती तो एक प्रसंग.

" बाबासाहेब लंडनला गेले. इकडे रमाई वराळे सोबत धारवाडला गेली. सोबत लक्ष्मीबाई होती. धारवाडच्या मोकळया हवेत रमाईला बरं वाटू लागले. तिची प्रकृती सुधारु लागली. तिला नवा हु रुप येऊ लागला बरं वाटू लागलं तशी रमाई वसतिगृहातील मुलाकडे लक्ष देऊ लागली.

एके दिवशी रमाइच्या लक्षात आलं की वसतिगृहाचं स्वयंपाक घर शांत आहे. स्वयपाक घरात काहीही नव्हतं भाजीपाला नव्हता. तेल मीठ नव्हते काहीही नव्हते असं का हो वराळे ?

वसतिगृहाची ग्रँट अजून आली नाही, मागची बाकी थकल्याने वाणी उधार द्यायला तयार नाही.

रमाईच्या लक्षात सारं आलं रमाईला वाईट वाटलं ती वराळेना म्हणाली.

मुलाना उपाशी ठेवणार ?
भुकेची आग रमाईला माहित होती. तिनं हातातील सोन्याच्या बांगडया काढल्या, गहाण ठेवायला पाठवल्या.

सर्व सामान आणायला सांगितले त्या दिवशी रमाईन स्वत:च्या हातानी स्वयपाक केला आणि स्वत:च्या हातान मुलाना जेवण वाढले.

मुल जेवत होती, रमाईच काळीज सुपा एवढं होत. मुलांना जेवण वाढणारे रमाइचे हात भुंडे होते. त्यात सोन्याच्या बांगडया नव्हत्या. पण हे हात मुलाना आपल्या आईचे हात वाटत होते. मुलं तृप्त होत होती. भिजलेल्या डोळ्यानी आपल्या सांस्कृतिक मातेला पहात होती ."[11]

आईच्या प्रेमापुढे पैशाला किंवा सोन्याला किंमत रहात नाही. हे यातून जाणवते. यातून रमाईच्या व्यक्तिमत्वाचा एक वेगळा पैलू स्पष्ट होतो. ती कारुण्यमूर्ती होती. इतरासाठी त्याग करणारी होती. बाबासाहेबानी समाजाला सर्वस्व दिले. रमाईनही जसा जमेल तसा त्याग केला सेवा केली.

अवघ्या प्रिय मुलांच्या मृत्यूनही ती खचली नाही. तीन खूप भोगले पण तक्रार केली नाही तिच हृदय विशाल होत. " या रमाईन खूप भोगलं पण तक्रार केली नाही. स्वत: जळली पण त्याची धग कोणाला लागू दिली नाही. तोंडातून कठोर शब्द काढला नाही तिनं नव-यासाठी अपार कष्ट उपसले. पण त्याचा उच्चार तिनं नव-याजवळ केला नाही ती अशी अबोल होती. तिला माहित होतं.

आपल्या प्रिय माणसासाठी अनंत यातना भोगाव्या अनंत कष्ट भोगावेत पण कोणाजवळ ते बोलू नये आपल्या प्रिय व्यक्तिजवळही त्याचा उच्चार करु नये सांगू नये भोगावं. सांगीतल्यानं कष्टाच मोल कमी होतं. प्रेमाची किंमत कमी होते. कळतं, न सांगताही ते कळतं पोचतं नजरेच्या पुलावरुन या न सांगीतलेल्या गोष्टींची रहदारी होत रहाते.

रमाईन नव-याच्या नजरेतील कृतज्ञता भिजाल्या डोळयानी वाचली. आयुष्याची कमान करुन तिनं दु:खाच स्वागत केल. सत्कार केला दु:खाचा।

या दु:खानी रमाला काय दिले ? रमाचो या दु:खामुळेच रमाई झाली ."[१२]

रमाईन कुणाली न सांगता आलेल दु:ख ती स्वत: पचवी कारण तिला माहित होतं. जे काही आपण काम केलं ते कुणालाही न सांगता ते आपोआपच कळत असते.

रमाईला आपले जीवन चालवत असताना अचानक तीला आपल्या बालपणाची आठवण होते.

" दापोलीला असताना आई मला अनेकदा म्हणाली होती. " रमा तु मोठी भाग्यवान होणार आहेस " आईच्या तोंडून सहजपणे बाहेर पडलेले हे बोलणे मला आठवलं म्हणजे खरोखरच माझं जीवन सार्थ झाल्यासारखं मला वाटतं. मी नेहमीच म्हणायची की " स्त्रीच जीवन म्हणजे पतीच्या चरणावर भक्तिभावाने आणि आदराने समर्पित केलेले एक कमल पुष्पच असते. साहेबानी माझ्यासारख्या अशिक्षित बाईबरोबर संसार रथ ओढला होता. बडोदे सरकारचं वीस हजार रुपयाच कर्ज होतं. बाळाराम भावोजीनी वेगळा संसार थाटला होता. घरात उत्पन्न फारसं येत नव्हतं. जे यायचे ते साहेब " दादर कॉलेजात शिकवायचे त्याचे ' या धकाधकीच्या संसारात सामाजिक कार्यातील त्यांची तळमळ आणि या कार्यासाठी साहेबानी काढलेल्या वेगवेगळया संस्था याकडे साहेबांचे रात्रंदिवस लक्ष असायचं. त्यामुळे हा संसाररथ मी लक्ष्मीबाईच्या सल्ल्याने हाकीत असे.

राजगृहावर आम्ही जेव्हा रहायला आलो. तेव्हापासून जाणा-या येणा-यांची नेहमीच घरी वर्दळ असे. भेटायला आलेला माणूस माझी चौकशी करायचा. साहेबांचीही नेहमी चौकशी चालायची मला माझ्यापेक्षा साहेबांचीच जास्त काळजी वाटू लागली होती. वारंवार मिळणा-या खुनाच्या धमक्या सामाजिक कार्यासाठी सतत होणारे दौरे यामुळे मी त्यांच्या जिविताचा धक्का घेतला होता. या धसक्यानेच मी आजारी पडले. आपल्यामागे साहेबांचे कसं होईल. या नव्या काळजीने मला ग्रासून टाकले. होते. अमावस्येनंतर कलेकलेप्रमाणे वाढणा-या चंद्रासारखे साहेबांचे तेज वाढू लागले होते. " गोलमेज परिषदेतील त्यांच्या कामगिरीबद्दल सरकार दरबारी साहेबांचं वजन पडू लागलं होतं. समाजात मान मिळू लागला होता. परंतू मी आजारी असताना साहेब जेव्हा मला भेटायला येत असत, त्यावेळी माझ्याकडे पाहून ते जड अंत:करणाने विश्वास टाकीत त्यावेळी त्यांचा दु:खी चेहरा पाहिला म्हणजे माझ्या हृदयात कालवाकालव व्हायची आणि मी मनातच म्हणायची

" जगदंबे, सोडव एकदा मला या आजारातून ! साहेबांच्या दुःखी चेहरा मला नाही आता पाहवत, कशाला माझा अंत पहातेस ? ".[13] रमाईला आपले बालपणातील आईचे शब्द आठवल्यावर आपले जीवन सार्थक झाले असे वाटणे आणि आपल्या नव-याला दुस-याकडून धमक्या ऐकणे यामध्ये बराच फरक जाणवतो. ती आपल्या नव-याने आपल्याजवळ आल्यानंतर आनंदीत दिसावे यासाठी झिजत होती. पण नव-याचा दुःखी चेहरा पाहून ती स्वतःच देवाला साकडे घालते. की मला लवकर सोडव या जन्मातून एक हळव्या अंतःकरणाची स्त्री असे हे वर्णन वाटते.

अशा प्रकारे एक गृहिणी म्हणून, एक श्रेष्ठ पत्नी म्हणून, एक आदर्श माता म्हणून इतरासाठी कोणत्याही प्रकारचा त्याग करायला तयार असलेली त्यागाची मूर्ती म्हणून एक संपन्न भावजीवन " युगप्रवर्तक " आणि " रमाई " या दोन कादंब-यातून प्रगट झालेले आहे.

या आधिच्या प्रकरणात उल्लेख केल्याप्रमाणे कौटुंबिक जीवनात अपत्यांच्या अकाली मृत्यूचे आघात झाले. पतिच्या वियोगाचे प्रसंग आले. दारिद्र्याचे चटके सहन करावे लागले परंतु हे सर्व सहन करुन रमाई ही उत्तरोत्तर मोठीच होत गेली. उत्तरोत्तर तिचे समृध्द होत गेलेले भावजीवन " युगप्रवर्तक " मधून हरिभाऊ पगारेनी व " रमाई " मधून यशवंत मनोहर यांनी अतिशय समर्थपणे आणलेले आहे.

ब-याच वेळेला असे घडते की, एखादा श्रेष्ठ आणि युगप्रवर्तक व्यक्तिमत्वाच्या प्रभावाखाली त्याच्या पत्नीचे चित्रण दुय्यम स्वरुपाचे ठरण्याची शक्यता असते. या दोन्ही कादंब-यामध्ये रमाईचे भावजीवन अगदी स्वतंत्रपणे आणि तरीही बाबासाहेबांच्या सारख्या श्रेष्ठ व्यक्तिला प्रेरक बनले आहे.

रमाई ही बाबासाहेबांच्या जगण्याचा फार मोठी आधार ठरली आहे. बाबासाहेबांच्या जीवन स्पर्शाने रमाईच्या जीवनाचेही सोने झालेले आहे. ख-या अर्थाने एका वादळाशी संसार करीत असताना रमाईच्या ठिकाणी असणारी प्रचंड जीवन शक्तीच या कादंब-यातून अनेक प्रसंगातून प्रगट झालेली आहे. सामान्यातील असामान्यत्व दाखविण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे.

## संदर्भ टीपा


| | | |
|---|---|---|
| १. | मनोहर, यशवंत | रमाई पृष्ठ ८,९,१० आ. १ ली |
| २. | किरता | पृष्ठ १०,११ |
| ३. | पगारे, हरिभाऊ | युगप्रवर्तक, पृष्ठ ४६ आ. १ ली |
| ४. | मनोहर, यशवंत | रमाई, पृष्ठ १२, १३, १४ आ. १ ली. |
| ५. | किरता | पृष्ठ १४,१५ |
| ६. | पगारे, हरिभाऊ | युगप्रवर्तक पृष्ठ ४७ आ. १ ली |
| ७. | मनोहर, यशवंत | रमाई, पृ. २८. ३१ ३२ ३४ ३५ आ. १ ली. |
| ८. | किरता | पृ. ३५, ३६ |
| ९. | किरता | पृ. ३८, ४०, ४२ |
| १०. | किरता | पृ. ४४, ४५ |
| ११. | किरता | पृ. ८३, ८४ |
| १२. | किरता | पृ. ७२ |
| १३. | पगारे, हरिभाऊ | युगप्रवर्तक, पृ. ६८, ६९ आ. १ ली |